REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 3 | DECEMBER - 2025

# "ग्रामपंचायत विकास आराखडा अंमलबजावणीतील लोकसहभागाचे महत्त्व व आव्हाने"

**प्रा. उध्दव जमदाडे**
**सहयोगी प्राध्यापक,**
**श्री सरस्वती समाजकार्य महाविदयाल, वाशिम.**

## सारांश (Abstract)



भारतातील विकेंद्रित लोकशाही व्यवस्थेमध्ये ग्रामपंचायत विकास आराखडा (Grampanchayat Development Plan – GPDP) ही ग्रामीण विकासाची महत्त्वपूर्ण प्रक्रिया मानली जाते. या आराखड्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी लोकसहभाग ही केंद्रस्थानी भूमिका बजावते. लोकसहभागाच्या माध्यमातून ग्रामस्थांचा थेट सहभाग, गरजांचे लोकाधारित नियोजन, प्राधान्यक्रम निश्चिती तसेच पारदर्शकता व उत्तरदायित्व सुनिश्चित होते. त्यामुळे GPDP ही प्रक्रिया केवळ प्रशासकीय न राहता सहभागी व समावेशक विकासाचे साधन ठरते.

या शोधनिबंधाचा उद्देश ग्रामपंचायत विकास आराखड्याच्या अंमलबजावणीमध्ये लोकसहभागाचे महत्त्व अधोरेखित करणे तसेच त्यासमोरील प्रमुख आव्हानांचे विश्लेषण करणे हा आहे. या अभ्यासात असे आढळून येते की, अल्प लोकसहभाग, नागरिकांमध्ये माहितीचा अभाव, सामाजिक-आर्थिक विषमता, राजकीय हस्तक्षेप, महिलांचा व दुर्बल घटकांचा मर्यादित सहभाग, तसेच प्रशासनिक क्षमतेचा अभाव ही जीपीडीपीच्या अंमलबजावणीमध्ये लोकसहभाग प्रक्रियेतील प्रमुख आव्हाने आहेत. यामुळे GPDP च्या अंमलबजावणीत अपेक्षित परिणाम साध्य होण्यास अडथळे निर्माण होतात.

प्रस्तुत शोधनिबंधात दुय्यम माहिती स्त्रोतांचा वापर करून लोकसहभाग प्रक्रियेचे विश्लेषण करण्यात आले असून, लोकसहभाग वाढवण्यासाठी जनजागृती, क्षमता विकास, प्रशिक्षण, माहिती तंत्रज्ञानाचा वापर आणि समावेशक धोरणांची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे. लोकसहभाग सक्षम केल्यास GPDP अंमलबजावणी अधिक प्रभावी, उत्तरदायी व शाश्वत होऊ शकते, असा निष्कर्ष या अभ्यासातून मांडण्यात आला आहे.

**कीवर्ड्स :** ग्रामपंचायत विकास आराखडा, लोकसहभाग, ग्रामीण विकास, स्थानिक स्वराज्य संस्था,आव्हाने.

## प्रस्तावना

भारतामध्ये ग्रामीण विकासासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. ७३ व्या घटनादुरुस्तीने ग्रामपंचायतींना घटनात्मक दर्जा देऊन ग्रामसभेला लोकशाहीची मूलभूत पायाभरणी म्हणून मान्यता दिली आहे. ग्रामपंचायत विकास आराखडा (Gram Panchayat Development Plan – GPDP) हा ग्रामस्तरावरील सर्वांगीण विकास साधण्यासाठी तयार केला जाणारा वार्षिक आराखडा असून, त्याच्या प्रभावी अंमलबजावणीत लोकसहभागाचा अत्यंत महत्त्वाचा वाटा आहे. तथापि, लोकसहभाच्या सहभागास अनेक व्यावहारिक अडचणी देखील भेडसावत आहेत. लोकशाही व्यवस्थेत विकास प्रक्रिया प्रभावी व शाश्वत होण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असतो. भारतीय ग्रामीण विकासाच्या संदर्भात लोकसहभाग ही संकल्पना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्याशी निगडित आहे. ७३ व्या घटनादुरुस्तीने ग्रामसभा व ग्रामपंचायत यांना घटनात्मक दर्जा देऊन लोकसहभागाला कायदेशीर अधिष्ठान दिले आहे (Government of India, 1992). ग्रामपंचायत विकास आराखडा (GPDP) हा सहभागी नियोजनाचा महत्त्वाचा दस्तऐवज असून, त्याच्या यशस्वी अंमलबजावणीत लोकसहभाग निर्णायक ठरतो. प्रस्तुत शोध निबंधात याबाबत विश्लेषण करण्यात आले असून उपाययोजना शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

## शोधनिबंधाचे उददेश

प्रस्तुत शोध निबंध पुढील उददेशावर आधारीत आहे-

१. ग्रामपंचायत विकास आराखडयाची संकल्पना स्पष्ट करुन महत्व व आवश्यकता स्पष्ट करणे

२. ग्रामपंचायत आराखडयाच्या यशस्व अंमलबजावणीत लोकसहभागाचे महत्व व आवश्यकता अधोरेखीत करुन लोकसहभागामधील आव्हानांवर प्रकाश टाकणे

## पध्दतीशास्त्र

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम तथ्यांचा उपयोग करण्यात आला असून यासाठी शासकीय अहवाल तथा विविध संशोधक, साहित्यकारांच्या साहित्याचा उपयोग करण्यात आला आहे.

## ग्रामपंचायत विकास आराखड्याची संकल्पना

ग्रामपंचायत विकास आराखडा म्हणजे ग्रामपातळीवरील गरजा, समस्या, उपलब्ध संसाधने आणि भविष्यातील विकासाच्या दिशा यांचा विचार करून तयार करण्यात येणारा सहभागी व सर्वसमावेशक विकास आराखडा होय. या आराखड्यात शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, स्वच्छता, महिला व बालकल्याण, सामाजिक न्याय, रोजगार, पायाभूत सुविधा इत्यादी क्षेत्रांचा समावेश असतो.

## अ) ग्रामपंचायत विकास आराखड्याचे महत्त्व

### १. तळागाळातून नियोजन (Bottom-up Planning)

ग्रामसभेच्या माध्यमातून नागरिकांच्या गरजा व प्राधान्ये ठरवली जातात; त्यामुळे योजना वास्तवाधारित बनतात.

### २. लोकसहभाग व लोकशाही बळकटी

ग्रामसभा, महिला, युवक, वंचित घटकांचा सहभाग वाढतो; पारदर्शकता व जबाबदारी  निर्माण होते.

### ३. समन्वित व सर्वांगीण विकास

पाणी, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, रोजगार, पायाभूत सुविधा, सामाजिक न्याय इ. क्षेत्रांचा एकत्रित विचार होतो.

### ४. शाश्वत विकास उद्दिष्टांशी (SDGs) संलग्नता

दारिद्र्य निर्मूलन, स्वच्छ पाणी, स्वच्छता, आरोग्य, लैंगिक समानता, पर्यावरण संरक्षण यांसारखी उद्दिष्टे साध्य करण्यास मदत.

### ५. संसाधनांचा कार्यक्षम वापर

उपलब्ध निधी, मनुष्यबळ व नैसर्गिक संसाधनांचे नियोजनबद्ध व परिणामकारक उपयोग होतो.

### ६. विकासातील प्राधान्यक्रम निश्चिती

तातडीच्या गरजा, दीर्घकालीन उद्दिष्टे व लाभार्थी-केंद्रित योजना ठरतात.

## ब) ग्रामपंचायत विकास आराखड्याची आवश्यकता

### १.  गरजांनुसार विकास

प्रत्येक गावाची भौगोलिक, सामाजिक व आर्थिक परिस्थिती वेगळी असल्याने स्थानिक पातळीवरील नियोजन आवश्यक.

### २. योजनांची परिणामकारक अंमलबजावणी

स्पष्ट उद्दिष्टे, वेळापत्रक व जबाबदाऱ्या असल्याने अंमलबजावणी सुलभ होते.

### ३. निधी मिळविण्यासाठी आवश्यक दस्तऐवज

केंद्र व राज्य योजनांचा निधी मिळवताना GPDP महत्त्वाचा आधार ठरतो.

### ४. वंचित घटकांचा समावेश

महिला, अनुसूचित जाती-जमाती, दिव्यांग, गरीब कुटुंबे यांना प्राधान्य देता येते.

### ५. पारदर्शकता व सामाजिक लेखापरीक्षण

खर्च, प्रगती व परिणाम यांचे मूल्यमापन शक्य होते; भ्रष्टाचारास आळा बसतो.

### ६. दिर्घकालीन विकासाची दिशा

तात्कालिक गरजांसोबत भविष्यकालीन विकासाचा आराखडा तयार होतो.

## लोकसहभागाची संकल्पना व व्याख्या

लोकसहभाग म्हणजे समाजातील नागरिकांनी स्वेच्छेने, जाणीवपूर्वक आणि सक्रियपणे विकास प्रक्रियेच्या विविध टप्प्यांत सहभागी होणे होय. ओकली व मार्स्डेन (1984) यांच्या मते, लोकसहभाग ही अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये लोक स्वतःच्या विकासाशी संबंधित निर्णयांमध्ये प्रभावी भूमिका बजावतात.

चेंबर्स (1997) यांच्या मते, विकास प्रक्रियेत "शेवटच्या व्यक्तीला प्रथम स्थान" देणे हे लोकसहभागाचे मूलतत्त्व आहे.

भारतीय संदर्भात लोकसहभाग ही केवळ सल्लागार भूमिका नसून, निर्णय, अंमलबजावणी, देखरेख व मूल्यमापन या सर्व टप्प्यांतील सहभाग दर्शवते (Tandon, 2008).

## लोकसहभागाची उद्दिष्टे

**लोकसहभागाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :**

१. लोकशाही प्रक्रियेला बळकटी देणे
२. स्थानिक गरजांवर आधारित विकास साधणे
३. पारदर्शकता व उत्तरदायित्व वाढवणे
४. दुर्बल व वंचित घटकांना निर्णय प्रक्रियेत सामावून घेणे
५. शाश्वत व सर्वसमावेशक विकास साधणे (World Bank, 1996)

## लोकसहभागाची प्रक्रिया

लोकसहभाग ही एक सतत चालणारी व टप्प्याटप्प्यांची प्रक्रिया आहे.

### १. समस्या ओळख व गरज निर्धारण

या टप्प्यात ग्रामसभा, सर्वेक्षण, चर्चा यांद्वारे स्थानिक समस्या व गरजा निश्चित केल्या जातात. लोकांच्या प्रत्यक्ष अनुभवावर आधारित समस्या ओळखल्याने नियोजन वास्तववादी बनते (Chambers, 1997).

### २. नियोजन व निर्णय प्रक्रिया

ओळखलेल्या गरजांवर उपाययोजना ठरवून प्राधान्यक्रम निश्चित केला जातो. GPDP तयार करताना लोकसभा, लोकप्रतिनिधी व प्रशासकीय यंत्रणा यांचा सहभाग अपेक्षित असतो (Government of India, 2014).

### ३. अंमलबजावणीतील सहभाग

ठरवलेल्या योजनांच्या अंमलबजावणीत नागरिक श्रमदान, समित्यांमधील सहभाग व सहकार्याच्या माध्यमातून सहभागी होतात. त्यामुळे योजनांबाबत मालकीभाव निर्माण होतो (Mishra & Sharma, 2012).

### ४. देखरेख व सामाजिक नियंत्रण

सामाजिक लेखापरीक्षण, ग्रामसभा व लोकनियंत्रण यांद्वारे विकास कामांची गुणवत्ता व खर्चावर नियंत्रण ठेवले जाते (World Bank, 2017).

### ५. मूल्यमापन व अभिप्राय

पूर्ण झालेल्या योजनांचे मूल्यमापन करून सुधारणा सुचविल्या जातात. हा अभिप्राय पुढील नियोजनासाठी उपयुक्त ठरतो (UNDP, 2018).

### • GPDP मध्ये लोकसहभागाचे महत्व

### √ लोकाभिमुख व वास्तववादी नियोजन

लोकसहभागामुळे GPDP हा नागरिकांच्या प्रत्यक्ष गरजा, समस्या व अपेक्षा यांवर आधारित तयार होतो. त्यामुळे विकास नियोजन केवळ कागदोपत्री न राहता व्यवहार्य ठरते .

### √ स्थानिक समस्या व गरजांची अचूक ओळख

ग्रामसभा व लोकचर्चांमधून पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, रोजगार, स्वच्छता अशा स्थानिक समस्या स्पष्टपणे समोर येतात. यामुळे प्राधान्यक्रम ठरविणे सुलभ होते.

**√ लोकशाही सशक्तीकरण**

GPDP प्रक्रियेत लोकांचा थेट सहभाग असल्यामुळे निर्णय प्रक्रिया लोकशाही मूल्यांवर आधारित होते. नागरिकांमध्ये जबाबदारीची व हक्कांची जाणीव निर्माण होते.

**√ पारदर्शकता व उत्तरदायित्व**

लोकसहभागामुळे निधीचा वापर, कामांची निवड व अंमलबजावणी यावर सामाजिक नियंत्रण राहते. सामाजिक लेखापरीक्षणामुळे पारदर्शकता वाढते व भ्रष्टाचारास आळा बसतो.

**√ सामाजिक न्याय व समावेशक विकास**

महिला, अनुसूचित जाती-जमाती, गरीब व दुर्बल घटक यांचा सहभाग GPDP मध्ये सुनिश्चित झाल्यास समताधिष्ठित व समावेशक विकास साधता येतो.

**√ योजनांची प्रभावी अंमलबजावणी**

लोकांचा सहभाग असल्यामुळे योजनांना सामाजिक स्वीकार्यता मिळते आणि अंमलबजावणी अधिक परिणामकारक ठरते.

**• GPDP मध्ये लोकसहभागाची आवश्यकता**

**√ शाश्वत विकासासाठी**

लोकसहभागाशिवाय विकास उपक्रम टिकाऊ ठरत नाहीत. लोकांचा सहभाग असल्यास योजनांची देखभाल व सातत्य राखले जाते (UNDP, 2018).

**√ शासन योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी**

केंद्र व राज्य शासनाच्या विविध विकास योजनांची अंमलबजावणी GPDP च्या माध्यमातून होते. लोकसहभागामुळे या योजना प्रभावीपणे राबविता येतात (Government of India, 2015).

**√ स्थानिक गरजांशी सुसंगत आराखड्यासाठी**

एकसारख्या योजना न राबवता स्थानिक परिस्थितीनुसार विकास आराखडा तयार करण्यासाठी लोकसहभाग आवश्यक आहे.

**√ सामाजिक भांडवल निर्माण करण्यासाठी**

सहकार्य, विश्वास व सामूहिक कृती यांमुळे सामाजिक भांडवल तयार होते, जे ग्रामीण विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे (PRIA, 2017).

**√ जबाबदार नागरिक घडविण्यासाठी**

लोकसहभागामुळे नागरिकांमध्ये सार्वजनिक मालकीची भावना व कर्तव्यभावना निर्माण होते (Tandon, 2008).

**जीपीडीपी मध्ये लोकसहभाग मिळवण्यासाठी येणारी आव्हाने**

ग्रामपंचायत विकास आराखडा प्रभावी होण्यासाठी लोकसहभाग अत्यंत आवश्यक आहे. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीत लोकसहभाग मिळवताना विविध सामाजिक, आर्थिक, प्रशासकीय व मानसिक अडचणी दिसून येतात.

**१) सामाजिक व सांस्कृतिक आव्हाने**

**अल्पजागरूकता :** ग्रामसभा, GPDP व त्याचे फायदे याबाबत पुरेशी माहिती नसणे
**जात, वर्ग व लिंगभेद :** महिला, दलित, आदिवासी, गरीब घटकांचा सहभाग कमी
**नेतृत्वावर अवलंबित्व :** काही मोजक्याच लोकांचे वर्चस्व

**२) आर्थिक आव्हाने**

**रोजगार व उपजीविकेचा दबाव :** कामगार वर्ग ग्रामसभेत येऊ शकत नाही
**प्रवास व वेळेचा खर्च :** विशेषतः दुर्गम गावांमध्ये उपस्थिती कमी
**गरीबीमुळे उदासीनता :** विकास प्रक्रियेवर विश्वास कमी

**३) प्रशासकीय व संस्थात्मक आव्हाने**

**ग्रामसभा आयोजनातील त्रुटी :** अपुरी पूर्वसूचना, गैरसोयीचा वेळ
**तांत्रिक क्षमतेचा अभाव :** GPDP प्रक्रिया समजावून सांगण्यात अडचणी
**कर्मचाऱ्यांची कमतरता :** ग्रामसेवकांवर कामाचा ताण

**४) राजकीय आव्हाने**

**राजकीय हस्तक्षेप :** पक्षीय हितसंबंधांमुळे सहभागात अडथळे
**गटबाजी व संघर्ष :** एकमत न होणे
**निर्णय आधीच ठरलेले असणे :** लोकांचा विश्वास कमी होतो.

### ५) माहिती व संवादातील आव्हाने

**भाषा व तांत्रिक शब्दावली :** सामान्य नागरिकांना समजत नाही

**माहितीचा अभाव :** योजना, निधी, कामांची माहिती वेळेवर न मिळणे

**डिजिटल दरी :** ऑनलाइन साधनांचा अपुरा वापर

### ६) मानसिक व वृत्तीगत आव्हाने

'आपण बोलून काही फरक पडणार नाही' अशी भावना

**पूर्वानुभवातील अपयश :** योजनेचा लाभ न मिळाल्याने निराशा

**भीती व संकोच :** विशेषतः महिला व वंचित घटकांत

### लोकसहभाग मिळवण्यासाठी उपाययोजना

ग्रामपंचायत विकास आराखडा (Gram Panchayat Development Plan – GPDP) हा सहभागी नियोजनावर आधारित ग्रामीण विकासाचा महत्त्वाचा साधन आहे. तथापि, अनेक ग्रामपंचायतींमध्ये लोकसहभाग अपेक्षित पातळीवर होत नाही. त्यामुळे GPDP प्रभावी ठरण्यासाठी लोकसहभाग वाढविण्यासाठी नियोजित उपाययोजना राबविणे आवश्यक ठरते.

### √ ग्रामसभा प्रभावी व नियमितपणे घेणे

ग्रामसभा ही लोकसहभागाची प्रमुख व्यासपीठ आहे. ग्रामसभा नियोजित वेळेत, नागरिकांना सोयीच्या दिवशी व ठिकाणी आयोजित केल्यास उपस्थिती वाढू शकते.

### √ जनजागृती व माहिती प्रसार

GPDP विषयी माहितीपत्रके, भित्तीपत्रके, माईक घोषणा, सामाजिक माध्यमे यांचा वापर करून नागरिकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे.

### √ महिला व दुर्बल घटकांसाठी विशेष उपाय

महिला, अनुसूचित जाती-जमाती, दिव्यांग व गरीब घटकांसाठी स्वतंत्र बैठकांचे आयोजन केल्यास त्यांचा सहभाग वाढतो.

### √ क्षमता वृद्धी व प्रशिक्षण कार्यक्रम

लोकप्रतिनिधी, ग्रामसेवक व नागरिकांसाठी GPDP व लोकसहभाग विषयक प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे.

**√ सामाजिक लेखापरीक्षण व पारदर्शकता**

सामाजिक लेखापरीक्षण, माहिती फलक व खुली चर्चा यांमुळे लोकांचा विश्वास वाढतो व सहभागास प्रोत्साहन मिळते.

**√ स्वयंसेवी संस्था व बचत गटांचा सहभाग**

स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट, युवक मंडळे यांचा सहभाग लोकसहभाग वाढविण्यास उपयुक्त ठरतो.

**√ डिजिटल व ई-गव्हर्नन्स साधनांचा वापर**

e-GPDP, मोबाईल ॲप्स्, व्हाटसॲप गट, ऑनलाइन फीडबॅक यांचा वापर केल्यास तरुण वर्गाचा सहभाग वाढतो .

**√ प्रोत्साहन व मान्यता देणे**

सक्रिय ग्रामपंचायती, ग्रामसभा व नागरिकांना पुरस्कार व मान्यता दिल्यास सहभाग वाढण्यास मदत होते .

## निष्कर्ष

ग्रामपंचायत विकास आराखड्याच्या यशस्वी अंमलबजावणीत लोकसहभाग अत्यंत निर्णायक आहे. लोकसहभागाशिवाय शाश्वत व समावेशक ग्रामीण विकास शक्य नाही. तथापि, सहभागास विविध सामाजिक, प्रशासकीय व संरचनात्मक अडचणी आहेत. या अडचणी दूर करून लोकसहभागाला सशक्त केल्यास GPDP हे ग्रामीण परिवर्तनाचे प्रभावी साधन ठरू शकते.

लोकसहभाग ही केवळ सहभागी होण्याची क्रिया नसून ती लोकशाही सशक्तीकरणाची प्रक्रिया आहे. ग्रामपंचायत विकास आराखड्याच्या यशासाठी लोकसहभाग अनिवार्य आहे. लोकांना निर्णय प्रक्रियेचा भाग बनविल्यास ग्रामीण विकास शाश्वत व परिणामकारक होऊ शकतो

## संदर्भ

1. Chambers, R. (1997). Whose reality counts? Putting the first last. London: Intermediate Technology Publications.
2. Desai, S. (2019). Participatory planning and rural development: An assessment of Gram Panchayat Development Plans. *Indian Journal of Public Administration, 65*(4), 745–760.
3. Gaikwad, V. R. (1981). *Rural development administration in India*. National Publishing House.
4. Government of India. (1992). The Constitution (Seventy-Third Amendment) Act, 1992. New Delhi: Government of India.

VOLUME - 15 | ISSUE - 3 | DECEMBER– 2025

5. Government of India. (2014). Guidelines for preparation of Gram Panchayat Development Plan (GPDP). Ministry of Panchayati Raj, New Delhi.
6. Government of India. (2015). People's participation and decentralized planning. Ministry of Panchayati Raj, New Delhi.
7. Mishra, S. N., & Sharma, S. (2012). Decentralized governance and people's participation. New Delhi: Mittal Publications.
8. Ministry of Panchayati Raj. (2015). *Guidelines for preparation of Gram Panchayat Development Plan (GPDP), 2015-2020*. Government of India.
9. Ministry of Panchayati Raj. (2023). *People's Plan Campaign (PPC): Sabki Yojana Sabka Vikas*. Retrieved from https://panchayat.gov.in
10. National Institute of Rural Development and Panchayati Raj (NIRDPR). (2022). *Training module on Gram Panchayat Development Plan*. Retrieved from https://nirdpr.org.in
11. Oakley, P., & Marsden, D. (1984). Approaches to participation in rural development. Geneva: International Labour Organization.
12. Patil, M. S. (2020). *A study of participatory rural planning through Gram Panchayat Development Plan in Maharashtra* (Doctoral dissertation). Savitribai Phule Pune University.
13. PRIA. (2017). Citizen participation in local governance. New Delhi: PRIA.
14. Sundaram, K. V. (2016). Panchayati Raj system in India. New Delhi: Oxford University Press. Tandon, R. (2008). Participatory research and development. New Delhi: PRIA Publications. UNDP. (2018). Decentralized governance and participatory development. New York.
15. World Bank. (1996). The World Bank participation sourcebook. Washington, DC. World Bank. (2017). Social accountability and citizen